NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# नीती आयोगाच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत मुलींच्या शिक्षण संक्रमण दराची सद्यस्थिती : विशेष संदर्भ सांगोला तालुका

**अमोल विलास भंडारी,** संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

---

**सारांश -**

भारत सरकारच्या निती आयोगामार्फत जानेवारी 2018 मध्ये आकांक्षीत जिल्हा कार्यक्रम व 7 जानेवारी 2023 रोजी या योजनेचा विस्तार म्हणून आकांक्षीत तालुका कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. केंद्र सरकार राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामध्ये सहकार्याची भावना निर्माण करून विकासाच्या प्रक्रियेत मागे असणाऱ्या तालुक्यांना बरोबर आणण्याकरिता हा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये एकूण पाचशे तालुक्यांचा समावेश असून महाराष्ट्रातील 27 तालुके आहेत. या उपक्रमामध्ये आरोग्य व पोषण आणि शिक्षण या दोन क्षेत्रांना सर्वाधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते. यामधील शिक्षण या क्षेत्राशी संबंधित एकूण 11 निर्देशक घेण्यात आले आहेत. त्यामधील दोन निर्देशक हे मुलींच्या उच्च प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर व माध्यमिक स्तरावर उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणासाठी प्रविष्ट होण्याच्या संक्रमण दराशी संबंधित आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात या कार्यक्रमात समाविष्ट असणाऱ्या सांगोला तालुक्यातील शिक्षण क्षेत्राशी संबंधित अकरा निर्देशकांपैकी यांच्या संक्रमण जराशी संबंधित दोन निर्देशकांची सद्यस्थिती याबाबत मांडणी करून संक्रमण दर वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

**प्रस्तावना -**

भारत हा एक खंडप्राय देश असून देशातील प्रत्येक राज्यात सामाजिक धार्मिक आर्थिक विविधता दिसून येते. देशाचा विकास घडवून आणायचा असेल तर प्रथम राज्ये विकसित होणे आवश्यक आहेत. याकरिता संघराज्य या संकल्पनेवर आधारित केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे एकत्रित प्रयत्न होणे गरजेचे आहे. मात्र भारतासारख्या विशाल आणि प्रत्येक घटकात वैविध्यता असणाऱ्या देशात संतुलित विकास साधने हे एक मोठे आव्हान असल्याचे दिसते. काही जिल्हे झपाट्याने प्रगती करत असताना विविध अहवालांमध्ये काही जिल्हे मूलभूत सुविधा आणि सामाजिक आर्थिक निर्देशांक मध्ये मागे असल्याचे दिसून आले.

भारत सरकारच्या नीती आयोगाने जानेवारी 2018 मध्ये देशातील 112 जिल्ह्यांमध्ये आकांक्षीत जिल्हा कार्यक्रम ( Aspirational District Programme - ADP ) सुरू करण्यात आला. ज्याचा उद्देश सर्वाधिक मागासलेल्या जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावणे, सहकारात्मक संघराज्य या संकल्पनेवर आधारित केंद्र आणि राज्य सरकारने मिळून काम करणे, तसेच या जिल्ह्यांमध्ये विकासाचे निकोप स्पर्धा निर्माण करणे हा आहे. हा कार्यक्रम सुरू असतानाच नीती आयोगाने आकांक्षीत जिल्हा कार्यक्रमाच्या धर्तीवर मूलभूत सुविधा सामाजिक आणि आर्थिक निर्देशांकात मागे असणाऱ्या तालुक्यांकरिता 7 जानेवारी 2023 रोजी आकांक्षीत तालुका कार्यक्रम ( Aspirational Block Programme - ABP ) सुरू केला. यामध्ये भारतातील एकूण 500 तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील अमरावती बीड चंद्रपूर गडचिरोली हिंगोली जालना नांदेड नंदुरबार नाशिक धाराशिव पालघर सोलापूर वर्धा वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमधील 27 तालुक्यांचा समावेश आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा सारख्या विकसित भागातील सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट व सांगोला या दोन तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये आरोग्य शिक्षण कृषी पशुसंवर्धन आणि मूलभूत सुविधा या क्षेत्रांचा समावेश असून यामधील शिक्षण क्षेत्राच्या 11 निर्देशांकांमधील मुलींचा संक्रमण सुधारणे यासंबंधी दोन निर्देशक आहेत. या कार्यक्रमांतर्गत शिक्षण क्षेत्राच्या उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तर आणि माध्यमिक स्थरते उच्च माध्यमिक स्तरावर मुलींचा संक्रमण दर हे निर्देशक महत्त्वाचे आहेत ज्यांचे दूरगामी परिणाम दिसून येतात.

प्रस्तुत शोधनिबंधात नीती आयोगाच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत मुलींच्या शिक्षण संक्रमण दराची सद्यस्थिती : विशेष संदर्भ सांगोला तालुका या विषयाच्या संदर्भाने चर्चा करण्यात आली आहे.

**बीज शब्द -** नीती आयोग , सहकारी संघराज्य, निर्देशक, संक्रमण दर, गळती

**उद्दिष्टे -**

1) आकांक्षित तालुका कार्यक्रम समजून घेणे.

2) आकांक्षित तालुका कार्यक्रमातील शिक्षण क्षेत्रातील निर्देशक समजून घेणे.

3) शिक्षण क्षेत्रातील (उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक) निर्देशकामधील मुलींच्या संक्रमण दराची सद्यस्थिती जाणून घेणे.

4) संक्रमण दर 100% होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहीतके -**

1) नीती आयोग देशातील सर्वच स्तरांसाठी कार्य करणारी यंत्रणा आहे.

2) केंद्र सरकार राज्य सरकार व पंचायतराज संस्था यांचे कार्य परस्पर पूरक आहे.

3) आकांक्षा तालुका कार्यक्रमामुळे तालुक्याचा सर्वंकष विकास होत आहे.

4) आकांक्षीत तालुका कार्यक्रमामुळे मुलींच्या संक्रमण दरात सुधारणा झाली आहे.

**आकांक्षीत तालुका कार्यक्रम -**

यामधील आकांक्षीत या शब्दाचे दोन अर्थ निघतात. याचा नकारात्मक अर्थ घेतला तर मागासलेला व जर सकारात्मक अर्थ घेतला तर नियोजित आणि संतुलित विकास साधण्याची संधी असे म्हणता येईल.

आकांक्षीत तालुका कार्यक्रमाची मुख्य तत्वे ( 3C's Frame work) -

आकांक्षीत तालुका कार्यक्रम हा खालील मुख्य तीन तत्त्वांवर आधारित आहे.


1) अभिसरण (Convergence) - यामध्ये आकांक्षीत तालुक्याचा संतुलित आणि शाश्वत विकास साधण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचे एकत्रीकरण आवश्यक मानण्यात आले आहे.

2) सहकार्य (Collaboration) - केंद्र राज्य आणि जिल्हा प्रशासन म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांच्यात समन्वय साधने हे या कार्यक्रमाचे मुख्य तत्व आहे.

3) स्पर्धा (Competition) - तालुक्यांच्या कामगिरीवर आधारित त्यांचे क्रमवारी (Delta ranking) लावून सर्व तालुक्यांमध्ये विकासाची निकोप स्पर्धा निर्माण करणे हे देखील आकांक्षीत तालुका कार्यक्रमाचे मुख्य तत्त्व आहे.

जानेवारी 2018 मध्ये सुरू झालेल्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रम याचा विस्तार म्हणजे आकांक्षीत तालुका कार्यक्रम. या कार्यक्रमांमध्ये संपूर्ण भारतातील 500 तालुक्यांचा समावेश असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील 27 तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळ समितीने राज्य सरकार सोबत सल्लामसलत करून या तालुक्यांची निवड केली आहे.

यामधील तालुक्यांची निवड करताना आरोग्य शिक्षण कृषी पशुसंवर्धन इत्यादी सर्व विभागांनी त्यांच्या विविध संकेतस्थळावर भरलेली माहिती आधारभूत ठेवण्यात आली. यामध्ये निवड करताना लोकसंख्येला 25% तर दरडोई उत्पन्न 75 % याचा आधार राज्यातील तालुक्याची निवड करताना ठेवण्यात आला. आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये पाच क्षेत्रांचा व त्यामधील 39 निर्देशकांचा समावेश करण्यात आला आहे.




या माहितीवरून आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये आरोग्य व पोषण आणि शिक्षण या क्षेत्रांना सर्वाधिक महत्त्व दिल्याचे दिसते. यामधील क्षेत्रांची निवड करताना शाश्वत विकासाची उद्दिष्टे समोर ठेवूनच रचना करण्यात आली आहे. हे सर्व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वात महत्त्वाचे असणारे क्षेत्र म्हणजे शिक्षण. शिक्षण या क्षेत्रातील 11 निर्देशकांमध्ये मुलींचा संक्रमण सुधारणे या संबंधित दोन निर्देशक समाविष्ट आहेत.

*शिक्षण क्षेत्राशी संबंधित निर्देशक*

| अ.क्र. | शिक्षण क्षेत्राशी संबंधित निर्देशक |
|---|---|

| | |
|---|---|
| 1 | उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तरावर स्थलांतरित झालेल्या मुलांची टक्केवारी |
| 2 | उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तरावर स्थलांतरित झालेल्या मुलींची टक्केवारी |
| 3 | माध्यमिक ते उच्च माध्यमिक स्तरावर स्थलांतरित झालेल्या मुलांची टक्केवारी |
| 4 | माध्यमिक ते उच्च माध्यमिक स्तरावर स्थलांतरित झालेल्या मुलींची टक्केवारी |
| 5 | ३० पेक्षा कमी पीटीआर असलेल्या प्राथमिक शाळांची टक्केवारी |
| 6 | मुलींसाठी पुरेशी स्वच्छतागृहे असलेल्या शाळांची टक्केवारी |
| 7 | विशेष गरजा असलेल्या मुलांना शिकवण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असलेल्या शाळांची टक्केवारी |
| 8 | दहावीच्या बोर्ड परीक्षेत ६०% आणि त्याहून अधिक गुण मिळवणाऱ्या मुलांची टक्केवारी |
| 9 | दहावीच्या बोर्ड परीक्षेत ६०% आणि त्याहून अधिक गुण मिळवणाऱ्या मुलींची टक्केवारी |
| 10 | बारावीच्या बोर्ड परीक्षेत ६०% आणि त्याहून अधिक गुण मिळवणाऱ्या मुलांची टक्केवारी |
| 11 | बारावीच्या बोर्ड परीक्षेत ६०% आणि त्याहून अधिक गुण मिळवणाऱ्या मुलींची टक्केवारी |

यामधील उच्च प्राथमिक मधून माध्यमिक स्तरावर दाखल होणाऱ्या मुलींचे प्रमाण तसेच माध्यमिक मधून उच्च माध्यमिक स्तरावर दाखल होणाऱ्या मुलींचे प्रमाण हा निर्देशक आरोग्य सामाजिक विकास इत्यादी घटकांना प्रभावित करतो. त्यामुळेच मुलींच्या संक्रमण दरावर आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**शालेय शिक्षणाचे स्तर -**

प्रचलित शिक्षण रचनेनुसार शिक्षणाचे स्तर खालील प्रमाणे आहेत.

1) इयत्ता पहिली ते पाचवी - प्राथमिक स्तर

2) इयत्ता सहावी ते आठवी - उच्च प्राथमिक स्तर

3) इयत्ता नववी ते दहावी - माध्यमिक स्तर

4) इयत्ता अकरावी ते बारावी - उच्च माध्यमिक स्तर

या रचनेनुसार इयत्ता पहिली मध्ये दाखल झालेल्या शंभर टक्के विद्यार्थ्यांनी बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले का ? याकडे आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये विशेष लक्ष दिल्याचे दिसते.

**संक्रमण दर -**

संक्रमण म्हणजे एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाणे. प्राथमिक स्तरावरील मुला मुलींचे उच्च प्राथमिक स्तरावर, उच्च प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर आणि माध्यमिक स्तरावर उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणासाठी प्रवेश घेण्याचे प्रमाण याच्या आधारे संक्रमण दर निश्चित केला जातो. आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये तालुक्यांची निवड करताना शालेय शिक्षण विभागाच्या Udise + portal वरील माहितीनुसार संक्रमण दर कमी असणारे तालुके निवडल्याचे दिसते.

**आकांक्षीत तालुका कार्यक्रम आणि सांगोला तालुका -**

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील सांगोला हा तालुका भौगोलिक दृष्ट्या माणदेश म्हणून ओळख असणाऱ्या अवर्षण प्रवण क्षेत्रात येतो. निसर्गाची अवकृपा आणि सतत दुष्काळी यामुळे या तालुक्यातील जनजीवन नेहमीच आव्हानात्मक राहिले आहे. असे असले तरी मागील काही वर्षात डाळिंब उत्पादनात अग्रेसर झाल्याने आर्थिक सुबत्ता वाढली आहे. तरीही तालुक्यातील दुर्गम भागात आर्थिक विषमता मात्र खूप मोठ्या प्रमाणात दिसून येते याचा परिणाम तालुक्यातील सर्वच घटकांवर पडतो.

सांगोला तालुक्यामध्ये एकूण 500 शाळा असून त्यामध्ये इयत्ता पहिली ते पाचवी चे शिक्षण देणाऱ्या 331 इयत्ता पहिली ते आठवीचे शिक्षण देणाऱ्या 53 शाळा मिळून एकूण 384 जिल्हा परिषद शाळा, 78 खाजगी अनुदानित शाळा तर

38 विनाअनुदानित व स्वयंअर्थसाहित शाळा आहेत. या शाळांमधून वाडी वस्तीवरील मुला मुलींना प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण दिले जाते.

इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यासाठी आणि विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सरल पोर्टल, महाडीबीटी पोर्टल तसेच केंद्र शासनाने यु-डायस पोर्टल नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल ( NSP )सुरू केले आहे. यामध्ये यु-डायस पोर्टल वर इयत्ता पहिली ते बारावी मध्ये दाखल सर्व मुलांची माहिती भरून त्यांना परमनंट एनरोलमेंट नंबर (PEN) दिला जातो. तसेच सर्व विद्यार्थ्यांची माहिती आधार व्हॅलिडेट केली जाते. शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर विद्यार्थ्यांचे पुढील इयत्तेत प्रमोशन केले जाते. यामुळे विद्यार्थी संक्रमण झाले अथवा नाही याची पडताळणी करणे सहज शक्य होते.

आकांक्षीत तालुका कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीपासूनची सांख्यिकीय माहिती यु-डायस पोर्टलवर उपलब्ध आहे. सांगोला तालुक्यातील मुलींच्या शिक्षण स्तर संक्रमणाची आकडेवारी पुढील प्रमाणे आहे.

मुलींचा संक्रमण दर उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तर
शिक्षण विभाग पंचायत समिती सांगोला

| शैक्षणिक वर्ष | तालुक्यातील एकूण इ.8 वी मध्ये दाखल मुली | शैक्षणिक वर्ष | तालुक्यातील एकूण इ.9 वी मध्ये दाखल मुली | फरक | संक्रमण दर | गळतीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 2021-22 | 2879 | 2022-23 | 2629 | 250 | 91.32 | 8.68% |
| 2022 - 23 | 2706 | 2023-24 | 2729 | -23 | 100.85 | 0% |
| 2023-24 | 2674 | 2024-25 | 2704 | -30 | 101.12 | 0% |
| 2024-25 | 2639 | 2025-26 | 2630 | 9 | 99.66 | 0.34% |

**( संदर्भ – Udise portal भारत सरकार )**

वरील माहितीवरून पुढील बाबी अधोरेखित होतात. सन 2021 22 या शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत सन 2022-23 मध्ये 250 मुलींची संक्रमण माध्यमिक स्तरावर न झाल्याने गळतीचा दर 8.68% दिसून आला. त्यानंतर मात्र सन 2023 24 व 2024 25 मध्ये संक्रमण जर 100% पेक्षा अधिक दिसून येतो. मात्र चालू शैक्षणिक वर्षात संक्रमण तर 99.66% असल्याने गळतीचे प्रमाण 0.34% दिसून येते.

मुलींचा संक्रमण दर माध्यमिक ते उच्च माध्यमिक स्तर
शिक्षण विभाग पंचायत समिती सांगोला

| शैक्षणिक वर्ष | तालुक्यातील एकूण इ.10 वी मध्ये दाखल मुली | शैक्षणिक वर्ष | तालुक्यातील एकूण इ.11 वी मध्ये दाखल मुली | फरक | संक्रमण दर | गळतीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 2021-22 | 2932 | 2022-23 | 1831 | 1101 | 62.45 | 37.55% |
| 2022 - 23 | 2452 | 2023-24 | 2006 | 446 | 81.81 | 18.19% |
| 2023-24 | 2546 | 2024-25 | 1878 | 668 | 73.76 | 26.24% |
| 2024-25 | 2666 | 2025-26 | 2005 | 661 | 75.21 | 24.79% |

( संदर्भ – Udise portal भारत सरकार )

Udise portal वरील आकडेवारीनुसार सन 2022 23 मध्ये संक्रमण दर सर्वात कमी असून गळतीचे प्रमाण 37.55% दिसून येते. शैक्षणिक वर्ष सन 2023 24 मध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील गळतीचे प्रमाण 18.19% म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत 52% कमी झाले. शैक्षणिक वर्ष 2024 25 व 2025 26 मध्ये हे प्रमाण अनुक्रमे 26.24% व 24.79% दिसून आले.

भारतीय संविधानातील 86 व्या घटना दुरुस्तीने कलम 21 अ समाविष्ट झाल्याने सहा ते 14 वयोगटातील बालकांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळाला. त्यामुळे उच्च प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर मुलींचे 100% संक्रमण

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

झाल्याचे दिसून येते; परंतु माध्यमिक स्तरावर उच्च माध्यमिक स्तरात संक्रमण कमी प्रमाणात झाल्याने मुलींच्या गळतीचे प्रमाण अधिक दिसून येते.

**उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तर संक्रमण दर 100% असण्याची कारणे -**

1) शिक्षणाचा मूलभूत अधिकार -

86 वी घटनादुरुस्ती 2002 नुसार कलम 21 समाविष्ट होऊन 6 ते 14 वयोगटातील बालकांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळाला. ज्यामुळे 14 वर्षापर्यंत मुलांना शिक्षण देणे कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आले आहे.

2) राईट टू एज्युकेशन 2009 -

शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता केंद्र शासनाने 2009 साली राईट टू एज्युकेशन ॲक्ट मंजूर केला. ज्यामुळे शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी होऊन उच्च प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर संक्रमण सुधारण्यास मदत झाली.

3) समग्र शिक्षा अभियान -

2001 साली सर्व शिक्षा अभियान या नावाने सुरू करण्यात आलेल्या अभियानाचा उद्देश शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देऊन गळती थांबविणे हा आहे. माध्यमिक स्तरापर्यंत या योजनेचा विस्तार करून त्याचे नाव समग्र शिक्षा अभियान करण्यात आले. या अभियानातून प्राप्त सुविधांमुळे उच्च प्राथमिक स्तरांतून माध्यमिक स्तरावर संक्रमण दर 100% गाठण्यास मदत झाली आहे.

4) विद्यार्थी लाभाच्या योजना -

इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांमुळे उच्च प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर होणाऱ्या संक्रमण दरामध्ये वृद्धी होण्यास मदत झाली आहे . यामध्ये मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, माध्यमांना भोजन योजना आणि समाज कल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या आर्थिक लाभाच्या योजनांमुळे गळती शून्य टक्के होण्यास नक्कीच सहाय्य झाले आहे.

5) मोफत बस सेवा -

शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलींकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोफत बस पास योजनेमुळे घरापासून अंतरावर असणाऱ्या शाळांपर्यंत पोहोचणे मुलींना सहज शक्य झाले आहे. त्यामुळे माध्यमिक स्तरावर गळतीचे प्रमाण दिसत नाही.

**माध्यमिक ते उच्च माध्यमिक स्तरावर संक्रमण दर कमी असण्याची कारणे -**

सांगोला तालुक्यामध्ये उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तरावरचा संक्रमण तर जरी 100% असला तरी माध्यमिक शिक्षण पूर्ण करून उच्च माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या मुलींचे प्रमाण मात्र लक्षणीयरीत्या कमी आहे. त्याची पुढील कारणे आहेत.

1) पालकांचे स्थलांतर -

सांगोला तालुका हा वर्ष क्षेत्रात येत असल्याने आजही ऊसतोड करण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करणारे कुटुंब आपल्या सर्व मुला मुलीं सहित स्थलांतरित होते त्याचा परिणाम म्हणून निश्चितच मुलींचे शिक्षण थांबविले जाते.

2) बालविवाह -

युनिसेफ आणि भारत सरकारच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक बालविवाह होणाऱ्या पहिल्या दहा जिल्ह्यात सोलापूर जिल्ह्याचा समावेश होतो. सोलापूर जिल्ह्यामध्ये सांगोला तालुक्यात बालविवाहाचे प्रमाण लक्ष्मी आहे. वय वर्ष 15 ते 18 या दरम्यान बालविवाह होण्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याने उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या कमी होते आणि त्याचा परिणाम संक्रमण दर कमी होण्यावर होतो .

3) आर्थिक स्थिती -

वाडी वस्तीवरील गरीब शेतमजूर आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने मुलींना दहावीनंतरचे शिक्षण देणे टाळतात. उलट या वयातील मुलींनी पालकांना त्यांच्या कामात मदत करावी अशी त्यांची अपेक्षा राहते. त्यामुळेही संक्रमण तर कमी होतो.

4) भौतिक सुविधांची कमतरता -

सांगोला तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शाळा या खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जातात. काही ठिकाणी पुरेशा प्रमाणात व योग्य स्थितीतील स्वच्छतागृहांची कमतरता दिसून येते तसेच किशोरवयीन मुलींकरिता सॅनिटरी पॅड व वेंडिंग मशीन शाळा स्तरावर उपलब्ध नसणे हे देखील संक्रमण जर कमी होण्यामागील महत्त्वाचे कारण दिसते.

5) सामाजिक असुरक्षितता -

सांगोला तालुक्यात उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सोयी या महत्त्वाच्या गावांमध्येच असल्याने मुलींना मदत प्रवास एसटी, इतर साधना द्वारे अथवा पाई करावा लागतो. लिंग गुणोत्तरात तफावत असल्याने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पालकांसमोर असतो. स्थलांतर करत असताना पालक मुलींना मदतीसाठी व सुरक्षितता म्हणून स्वतः सोबतच घेऊन जाणे योग्य समजतात. त्यामुळे उच्च माध्यमिक स्तरावर संक्रमण दर कमी असल्याचे दिसते.

6) राजकीय नेतृत्वाची उदासीनता -

सांगोला तालुक्यातील राजकीय नेतृत्वाने माध्यमिक स्तरावरून उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणासाठी संक्रमित न होणाऱ्या मुलींच्या समस्येकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय ज्या संस्थांमार्फत चालविल्या जातात त्या सर्व संस्थांवर कोणत्या ना कोणत्यातरी राजकीय पक्षाचा अथवा नेतृत्वाचा प्रभाव दिसून येतो. मात्र असे असूनही उच्च माध्यमिक स्तरावरील या गळतीच्या प्रमाणाकडे नेतृत्वाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

7) ऑनलाइन प्रणालीतील उणिवा -

इयत्ता पहिली मध्ये दाखल होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती इयत्ता बारावी पर्यंत udise + प्रणालीवर उपलब्ध राहते. मात्र इयत्ता दहावी नंतर ज्या मुली डिप्लोमा इंजिनिअरिंग अथवा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात त्यांची माहिती दहावीनंतर पुढे घेतली जात नाही. त्यामुळे हे तालुक्यातील माध्यमिक स्तरावर उच्च माध्यमिक स्तरावरील संक्रमण तर हा कमी दिसून येतो.

**निष्कर्ष -**

1) आकांक्षीत तालुका कार्यक्रमांमध्ये शिक्षण क्षेत्रातील संक्रमण दर या समस्येवर लक्ष केंद्रित केले आहे.
2) उच्च प्राथमिक स्तरातील माध्यमिक स्तरावर संक्रमण शंभर टक्के होत आहे.
3) उच्च माध्यमिक स्तरावर मुलींच्या गतीचे प्रमाण लक्षणीय आहे.
4) उच्च माध्यमिक स्तरावरून गळती होण्यास आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक घटक जबाबदार आहेत.

**उपाययोजना -**

1) हंगामी वसतिगृह - अनुदानाच्या अभावी बंद करण्यात आलेली हंगामी वसतिगृहे पन्नास रुपये केल्यास स्थलांतर करणारे पालकांच्या मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध राहील. वस्तीग्रहाच्या ठिकाणी महिला ग्रहपालांची नेमणूक केल्यास सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणार नाही.
2) समुपदेशन - बालविवाहाचे दुष्परिणाम याविषयी पालकांचे समुपदेशन अतिशय महत्त्वाचे आहे. बालविवाहाचा मुलीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची जाणीव पालकांना करून दिल्यास निश्चितच बालविवाह पासून परावर्त होतील. परिणामी मुलींना उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाची संधी मिळेल.
3) योजनांचा विस्तार - शासकीय शाळांमध्ये लागू असणाऱ्या मोफत गणवेश पाठ्यपुस्तक शालेय पोषण आहार या योजनांचा विस्तार उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींकरता केल्यास निश्चितच त्याचा उपयोग उच्च माध्यमिक स्तरापर्यंत संक्रमण होण्यास मदत होईल.
4) शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराची मर्यादा वाढविणे - भारतीय संविधानातील कलम 21 अ नुसार 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले जाते. त्यामुळेच उच्च प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर होणाऱ्या संक्रमणाचा दर शंभर टक्के झाला आहे. कायद्यात दुरुस्ती करून जर वयोमर्यादा सहा ते अठरा वयोगटासाठी केली तर निश्चितच मुलींना शिक्षण मिळण्याची कायदेशीर चौकट प्राप्त होईल.

5) स्थानिक नेतृत्वाचे समुपदेशन - ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असणारे स्थानिक नेतृत्व यांचे या विषयाबाबत योग्य प्रशिक्षण आणि समुपदेशन घडवून आणल्यास गळतीच्या समस्येवरती उपाय योजना करण्याकरिता व्यापक चळवळ निर्माण करता येईल.
6) गाव विकासा आराखड्याचा प्रभावी वापर -

दरवर्षी प्रत्येक गावाकडून स्वतःचा गाव विकास आराखडा तयार केला जातो. तो तयार करत असताना शासनाकडून नऊ थीम देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संक्रमण जर कमी असणाऱ्या गावांमध्ये बालस्नेही गाव व महिला स्नेही गाव या दोन थीम वरती अधिक भर दिल्यास निश्चितच मुलींचा उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारा संक्रमण सुधारण्यास मदत होईल.

**संदर्भसूची -**

1) NITI Aayog 2025, Aspirational Blocks Programme, Programme primer and block development strategy.
2) Udise + block level data.
3) NITI Aayog 2025, Champions of change.